# मुलांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम

**पुणे :** पंख सामाजिक संस्था व क्रिकहिल फाउंडेशनच्या शाळांगण प्रकल्पाअंतर्गत श्रीमती सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय आणि रफी अहमद किडवाई उर्दू हायस्कूल, भवानी पेठ येथील शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणाधिकारी दीपक माळी, क्रिकहिल फाउंडेशनचे संचालक श्री. कैलास काटकर, क्रिकहील फाउंडेशनचे सीएसआर प्रमुख श्री. अजय शिर्के तसेच दोन्ही शाळांच्या मुख्याध्यापिका कर्णे व मोकाशी उपस्थित होत्या. पंख संस्थेच्या विश्वस्त कल्याणी भाबड यांनी मुलांना १० वी आणि १२ वी नंतरच्या करिअर विषयी मार्गदर्शन केले. उपस्थित विद्यार्थ्यांनी देखील त्यांच्या मनातील शंका विचारल्या आणि विविध क्षेत्रांतील करिअर विषयी माहिती घेतली.

मुलांना मार्गदर्शन करताना माळी म्हणाले, 'करिअर करताना धैर्य, चिकाटी, आत्मविश्वास या गोष्टी जोपासल्या पाहिजेत. आयुष्यात कोणतीही गोष्ट अशक्य नसते, नकारार्थी वातावरणाच्या भिंतीची चौकट मोडून बाहेर आले पाहिजे. तुम्हाला ज्या क्षेत्रात रस असेल तेच क्षेत्र करिअर म्हणून निवडा. व्यावसायिक कौशल्य आवश्यक आहे,' यामुळे व्यवसायाभिमुख शिक्षण घेणे गरजेचे आहे.' कैलास काटकर म्हणाले, 'जीवनात यश मिळवण्यासाठी ९० टक्क्यांपेक्षा जास्त मार्क मिळालेच पाहिजेत असे काही नाही.

जीवनात जे ध्येय गाठायचे आहे त्यावर लक्ष केंद्रित करा. मार्क म्हणजे फक्त एक सर्टिफिकेट आहे. तुम्ही प्रत्येक क्षण कसा अमलात आणताय ते महत्त्वाचे आहे. चुकांमधूनच शिका, त्याच गोष्टी कामाला येतात. कार्यक्रमाचे नियोजन पंख संस्थेच्या संचालिका स्मिता आपटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.